नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २३/०६/२०२६ ( मंगळवार )

---

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद, ४५ लाख ३५ हजारांचा मुद्देमाल जप्त पाचगाव पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन पाचगाव** :— दिनांक २३/०६/२०२६ रोजी पाचगाव पोलीस पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, चांपा टोल नाका येथे अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतूक केली जात आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीसांनी चांपा टोलनाका येथे नाकाबंदी केली असता संशयित ट्रक क्र. एम एच—४०/बी एफ २८३० मिळून आल्याने वाहन चालकास वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. **वाहन चालक पार्थ सुधीर रामटेके, वय २२ वर्ष, रा. सिरसाळा, ता. पवनी, जि. भंडारा** हा मिळुन आला. आरोपीस रेती (गौणखनिज) वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याच्याकडे कोणताही परवाना नसल्याबाबत माहीती प्राप्त झाली. मालकाबाबत विचारपुस केली असता मालक नामे **विरेंद्र दिनानाथ हटवार, वय ३६ वर्ष, रा. नागपूर अशी माहिती प्राप्त झाली.**

**पोलीसांनी पंचासमक्ष वाहनाची पाहणी केली असता ट्रक क्र. एम एच—४०/बी एफ २८३० किंमती ४५,००,०००/— रूपये आणि ७ ब्रास रेती किंमती ३५,०००/— रूपये असा एकुण किंमती ४५,३५,०००/—रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. नमुद आरोपी यांच्या विरूध्द पोलीस स्टेशन पाचगाव येथे कलम ३०३(२), ३(५) भा.न्या.सं २०२३, ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसुल संहीता १९६६, सहकलम ४, २१ खानी आणि नियमन अधिनियम अन्वये सहकलम २०७ मोंवाका. गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**




## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद, ३० लाख ४० हजारांचा मुद्देमाल जप्त बेला पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन बेला** :— दिनांक २३/०६/२०२६ रोजी बेला पोलीस पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा, पिपरा शिवार, उमरेड भिवापूर ते बेला कडे जाणाऱ्या रोडवर येथे अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतूक केली जात आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीसांनी मौजा, पिपरा शिवार उमरेड भिवापूर ते बेला कडे जाणाऱ्या रोडवर येथे नाकाबंदी केली असता संशयित अशोक लेलँड कंपनीचा ट्रक क्र. एम एच—३०/बी डी—५११३ मिळून आल्याने वाहन चालकास वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. वाहन चालक १) **अजीम खान अजगर खान, वय २४ वर्ष, रा. अकोला वाहक नामे २) जलाल खान यावर खान, वय २२ वर्षे रा. अकोला** हे मिळुन आले. आरोपीस रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याच्याकडे कोणताही परवाना नसल्याबाबत माहीती प्राप्त झाली. मालकाबाबत विचारपुस केली असता मालक नामे **कसीब खान करबतं खान, रा. अकोला**

अशी माहिती प्राप्त झाली. मालकाचे सांगण्यावरून रेती गडचिरोली येथून वाहून अकोला येथे नेत असल्याचे सांगितले.

**पोलीसांनी पंचासमक्ष** वाहनाची पाहणी केली असता अशोक लेलँड कंपनीचा ट्रक क्र. एम एच—३०/बी डी—५११३ **किंमती ३०,००,०००/— रूपये आणि ८ ब्रास रेती किंमती ४०,०००/— रूपये असा एकुण किंमती ३०,४०,०००/—रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. नमुद आरोपी यांच्या विरूध्द पोलीस स्टेशन बेला येथे कलम ३०३(२), ३(५) भा.न्या.सं २०२३, ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसुल संहीता १९६६, सहकलम ४, २१ खानी आणि नियमन अधिनियम १९५७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**



## नागपूर ग्रामीण जिल्हयात अवैध जुगार चालवणाऱ्यावर ०४ गुन्हे नोंद.

दिनांक २२/०६/२०२६ रोजी महाराष्ट्र जुगार कायदा अंतर्गत पोलीस स्टेशन बेला, एमआयडीसी बोरी, जलालखेडा यांनी अवैधरित्या सट्टापट्टी जुगार खेळणाऱ्या/खेळविणाऱ्या आरोपीतांवर छापा टाकुन सट्टापट्टी साहित्य व रोख रक्कम असा एकुण २१००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र जुगार अधिनियमान्वये एकुण ४ गुन्हे दाखल करण्यात आले आहे. ते खालीलप्रमाणे.

**पोलीस स्टेशन बेला येथे आरोपी नामे १) अजय गौतम शेवळे, वय २६ वर्ष, रा. सुकळी, ता. जि. नागपूर २) सिताराम रामराव सोरते, वय ५० वर्ष, रा सिर्सी, ता. उमरेड, जि. नागपुर याचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे २ गुन्हे नोंद, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे आरोपी नामे करण दिलीप भजभुजे, वय ३६ वर्ष, रा. रूईखेरी याचेवर ०१ गुन्हा नोंद. पोलीस स्टेशन जलालखेडा येथे आरोपी नामे प्रमोद शंकररावजी तूमसरे, वय ४२ वर्ष, रा. महेंद्री, ता. नरखेड, जि. नागपूर याचेवर ०१ गुन्हा नोंद.**

## वाहतूक नियमभंग करणाऱ्यांविरुद्ध सावनेर पोलीसांची प्रभावी कारवाई

दिनांक १८/०६/२०२६ चे एका वृत्तपत्रात सावनेर शहराला अनुसरून सडको पर बेधडक गाडीया दौडा रहे है नाबालिग वाहन चालक अशा शिर्षकाखाली बातमी प्रसीध्दी झाली आहे. यामध्ये अल्पवयीन बालके हे ट्रिपल सिट तसेच विनालायसन्स वाहने चालवित असल्याची बातमी दिली आहे. **सदर बातमीची सविस्तर माहीती अशी आहे की, सावनेर पोलीस स्टेशनच्या हद्दीत वाहतूक नियमांचे पालन व्हावे, अपघातांना आळा बसावा तसेच नागरिकांमध्ये वाहतूक नियमांबाबत जनजागृती निर्माण व्हावी या उद्देशाने सातत्याने विशेष मोहिमा राबविण्यात येत आहेत. ट्रिपल सिट, विना लायसन्स वाहन चालविणे, तसेच विविध प्रकरणांतील कारवाई मध्ये जानेवारी ते जुन २०२५ च्या तुलनेत जानेवारी ते जुन २०२६ (आजपर्यंत) मध्ये ३ टक्कयांनी वाढ झाली असुन ट्रिपल सिट च्या केसेस मध्ये एकुण १७ टक्कयांनी वाढ झाली आहे.**

**तसेच पोलीस विभागाच्या वतीने शाळा—महाविद्यालयांमध्ये वाहतूक नियमांविषयी सतत जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात येत असून, हेल्मेटचा वापर, वाहतूक नियमांचे पालन आणि अल्पवयीन मुलांना वाहन न देण्याबाबत पालकांना आवाहन करण्यात येत आहे.**

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध १३ गुन्हे नोंद

दिनांक २२/०६/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन मोहाफुल दारू, मोहाफुल रसायन सडवा, देशी दारू व इतर साहित्य असा एकुण ५८,६६०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण १३ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन देवलापार** येथे आरोपी नामे १) श्रीराम हरीचंद उईके, वय ५४ वर्ष, रा वडंबा शिवार, ता. रामटेक, जि. नागपुर २) महिला आरोपी यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन जलालखेडा येथे** आरोपी नामे १) अक्षय मधूकर राउत, वय २४ वर्ष, रा. घोगरा, ता. नरखेड, जि नागपूर २) अजय बद्रीनाथ खंडाते, वय २८ वर्ष, रा. रोहना, ता. नरखेड, जि. नागपूर ३) सागर सूरेश खंडारे, वय २४ वर्ष, रा. पेठमूक्तापूर, ता. नरखेड, जि नागपूर ४) चरनदास वामनराव वानखेडे, वय ४८ वर्ष, रा. पेठमूक्तापूर, ता. नरखेड, जि नागपूर ५) संजय चंद्रभान वाडबूधे, वय ४३ वर्ष, रा वार्ड क्र ३, जलालखेडा ता. नरखेड जि नागपूर याचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे ५ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन केळवद** येथे १) अल्केश लक्ष्मण गेटमे, वय ३५ वर्ष, रा वॉर्ड क्र १, झोपडपट्टी केळवद ता सावनेर २) पंडीत गणपत बमनोटे, वय ६५ वर्ष, रा. केळवद, ता. सावनेर यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन खापा येथे आरोपी** राधेश्याम हिरालाल उपरेड, वय ३९ वर्ष, रा. कोथुळणा, ता. सावनेर, जि. नागपुर याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन कळमेश्वर** येथे ०२ आरोपी यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन भिवापूर येथे आरोपी** श्याम किसना हेडाउ, वय ३९ वर्ष, रा. सिध्दार्थ नगर, भिवापुर जि. नागपुर यांचेवर १ गुन्हा नोंद,

**नमुद कारवाईत एकुण  ३०६० मिली देशी दारू, ६१ लिटर मोहाफुल दारू, १२०० लिटर मोहाफुल सडवा असा एकुण ५८,६६०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

## नागपुर ग्रामीण जिल्ह्यातील ७७९ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण आणि श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक २३/०६/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व  पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ७७९ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुट्टीबोरी येथे ३० आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३१ आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३३ आरोपी अशा एकुण ९४ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ४५ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे  ३१ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २४ आणि पोलीस स्टेशन वेलतुर ३० आरोपी पोलीस स्टेशन पाचगाव १२ आरोपी अशा एकुण १४२ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ६५ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ३१ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे २८ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३५ आरोपी अशा एकुण १५९ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३१ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे २० आरोपी पोलीस स्टेशन वडोदा येथे १६ आरोपी अशा एकुण ६७ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ४८ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३३ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे ३२ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे २३ आरोपी अशा १३६ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ६२ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे २७ आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ५५ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे ३७ आरोपी अशा एकुण १८१ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.



मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने